**Time Bound**

## क्र. सांख्यिकी/बस सवलत(४२)/२०१३/०८/०९

परिपत्रक :-

विषय : राज्यातील मुलींना पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी बसचा प्रवास मोफत करणेबाबत.

संदर्भ :१) शासन पत्र क्र.विशेऊ२०१२/प्र.क्र.२०३/विशि-३, दिनांक १७ ऑक्टोबर २०१२

२) मा.संचालक, उ.शि.,पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१३ मुलींना मोफत प्रवास/मवि-१/१८१२०, दिनांक ०७ नोंव्हेंबर २०१२.

प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी तसेच अध्यापक महाविद्यालये यांचे लक्ष विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, जिल्हा - रायगड यांच्या उपरोक्त संदर्भिय पत्राकडे वेधण्यात येते.

सदर परिपत्रकासोबत असलेल्या विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल यांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे महाविद्यालयाशी निगडीत असलेली खालील माहिती ई-मेल (jtdire.1910@gmail.com) व (jdhemumbai@gmail.com) तसेच हार्ड कॉपीद्वारे महाविद्यालयाच्या माहितीगार कर्मचा-यामार्फत विनाविलंब सादर करण्यास सांगितले आहे.

१) पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या व बसने प्रवास करणा-या मुलींची संख्या.
२) बसने प्रवास करणा-या मुली ज्या ठिकाणंहून महाविद्यालयात येतात त्या ठिकाणापासूनचे बसचे प्रवास भाडे रूपये.
३) विद्यार्थीनी शिक्षण घेत असलेले वर्ग / विद्याशाखा यांची माहिती.
४) सदर खर्च कोणत्या लेखा शिर्षाखाली मागविता येईल याबाबतचे आपले अभिप्राय.
५) विद्यार्थीनी निहाय येणारा मासिक / त्रैमासिक व वार्षिक एकत्रित येणारा खर्च व एकूण खर्च.

तरी सदर माहिती संकलित करून तात्काळ विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल व विभागीय संचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग यांच्या ई-मेलवर व त्याची एक प्रत उपकुलसचिव, सांख्यिकी विभाग (२०२), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे सॉफ्टकॉपी व हार्ड कॉपी पाठविण्याची व्यवस्था करावी.

सही/-
कुमार खैरे
(कुलसचिव)

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१३

प्रत : १) प्राचार्य, अशासकीय अनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी तसेच अध्यापक महाविद्यालये.
२) विभागीय संचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग.
३) विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल.